# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. ०७/०२/२०१५**

आज शनिवार दि. ०७/०२/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.३० वाजता सभा सुचना क्र. ६ दि. ०३/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ३) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ४) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ५) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ६) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ७) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ८) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ९) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ११) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १२) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १३) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १७) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १८) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १९) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २०) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २१) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २२) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २४) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २६) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २७) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| २८) | शरद केशव पाटील | सदस्य |
| २९) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३०) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३१) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३२) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३३) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३४) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३५) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३६) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३७) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ३८) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ३९) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४०) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४१) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४२) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४३) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४४) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४५) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४६) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ४७) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ४८) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४९) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५०) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५१) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५४) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ५५) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५६) | डॉ. नयना मनोज वसाणी | सदस्या |
| ५७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५८) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५९) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६०) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६३) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ६४) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६५) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ६६) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ६७) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ६८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६९) | प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |
| ७०) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७१) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७२) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७३) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७४) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| २) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| ३) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| ४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ५) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ६) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ७) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ८) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ९) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| १०) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ११) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| १२) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| १३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १४) | म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| १५) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| १६) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज – निरंक</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | उपमहापौर |
| २) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ४) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरिता उपस्थित सर्व नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी वर्ग व पत्रकार बंधूचे स्वागत करते. आजची विशेष महासभा मिरा भाईंदर शहराची परिवहन सेवा, शहराकरिता वाढीव पाणी पुरवठा योजना व महानगरपालिकेच्या हॉस्पीटलसाठी निधी स्थापन करणे ह्या महत्वाच्या विषयाकरिता आयोजित केलेली आहे. तरी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी ही विनंती. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपल्या सभागृहात निवडून आलेले नवनिर्वाचित सदस्य श्री. रवि व्यास ह्यांचे स्वागत करावे अशी मी आपणास विनंती करतो.

**मा. महापौर :-**

नगरसेवकांचे अजूनपर्यंत स्वागत केले नाही. बाब्रा मॅडम, सिमा शहा मॅडम ह्यांचे स्वागत केले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

प्रथा परंपरा सभागृहात एखादा नविन सदस्य निवडून आले तर त्यांचे स्वागत करतो आपणास विनंती केली बाकी निर्णय आपला.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा शनिवार दि. ०७/०२/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. ०३/०२/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६३, मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) या आरक्षणाचे ट्रक टर्मिनल व बस डेपो याप्रमाणे नावामध्ये बदल करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सभा सुरु होण्यापूर्वी एक माहिती हवी होती. गावात पत्रिका वाटली गेली. मिरा भाईंदर ठेकेदार शार्गिद म्हणून त्यामध्ये त्यांनी मा. आयुक्त, मा. उपायुक्त, नगरसचिव पासून सर्व अधिकाऱ्यांची नाव त्या पत्रिकेत छापली आहेत. ह्याच्या प्रोटोकॉलप्रमाणे आपल्यामुळे ते दिसून येते त्यांनी नातेवाईक पण छापले नाहीत हे कितपर्यंत योग्य आहे आणि ह्याला अधिकाऱ्याने आपली सहमती दिली आहे का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, अशा लग्नपत्रिकेमध्ये नाव छापण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने सहमती दिली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग हे बरोबर आहे का की एखादा ठेकेदार अशाप्रकारे नाव छापतो. उद्या एखादा व्यक्ति गणेशोत्सव करेल तो डोनेशन वैगेरे घेऊन अधिकाऱ्याची नाव टाकेल शुभेच्छुक म्हणून कमिशनर हे ते कितपर्यंत योग्य आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

नाव न विचारता टाकणे निश्चितच योग्य नाही. त्याच्याकडून विचारणा करु.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम, आज विशेष सभा आहे. विशेष सभा म्हणजे काय आणि का बोलावली मला माहिती पाहिजे.

**मा. महापौर :-**

मी बोलली तुम्ही ऐकले नाही. शहरासाठी पाणी, हॉस्पीटल हे विषय योग्य म्हणून ही सभा घेतली.

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझ्या मते शहरात अजून एक विशेष बाब आहे. आज देशभरात, राज्यभरात स्वाईन फ्लू पसरला आहे. आपल्या पालघर जिल्ह्यात, सूरतमध्ये, राजस्थानमध्ये आणि मुंबईला देखील किती लोक मृत्यूमुखी पडलेले आहे. आपले शहराला अधिकाऱ्यांना किंवा पदाधिकाऱ्यांना ह्याच्याबाबत काळजी घेण्याची गरज नाही का? ते विषय घेण्याची गरज वाटत नाही का?

**मा. महापौर :-**

आरोग्यात मला वाटते गेल्या महासभेत एक तास आरोग्यावर बोलले होते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

स्वाईन फ्लूवर चर्चा झालेली नाही.

**मा. महापौर :-**

स्वाईन फ्लू आता आला. विषय मी चार दिवस अगोदर काढले आहेत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

स्वाईन फ्लू एक महिन्यापासून ..................................

**मा. महापौर :-**

हे विषय झाले की त्याच्यावर चर्चा करु.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्या अधिकाऱ्यांनी कळवायला पाहिजे होते.

**नरेंद्र मेहता :-**

महाराष्ट्र शासनाने दि. ०७/०१/२०१५ रोजी मा. आयुक्त यांना अर्थसंकल्या विषयी तातडीने सभा लावावी असे निर्देश दिलेले होते. या सदंर्भात मा. आयुक्त सो. यांनी मा. महापौर यांना लेखी पत्र देवून अर्थसंकल्पाबाबत सभा लावावी असे कळविले होते. त्यानंतर मा. महापौर सो. यांनी अर्थसंकल्पा विषयी विशेष सभा न बोलवता सर्वसाधारण सभा दि. १५/०१/२०१५ रोजी आयोजित केलेली होती. या संदर्भात शासनाने दि. १४/०१/२०१५ रोजी मा. आयुक्त व मा. महापौर यांना दि. १५/०१/२०१५ च्या सभेचे निलंबन करुन मा. महासभेचे त्याच महिन्यात अर्थसंकल्पाविषयी विशेष सभेचे आयोजन करण्यांचे निर्देश दिलेले होते.

त्याचप्रमाणे दि. २०/०१/२०१५ रोजी विशेष सभेचे आयोजन करुन अंदाजपत्रकाला अंतिम मान्यता देऊन मा. आयुक्त सो. यांनी दि. २८/०१/२०१५ रोजी शासनाला कळविले आहे व निलंबीत सभा लावण्याकरीता शासनाची मान्यता मागितलेली आहे.

निलंबित सभा लावणेबाबत शासनाची मान्यता आजपर्यंत प्राप्त झालेली नाही. आज दि. ०७/०२/२०१५ रोजी लावण्यात आलेली सभा ही कोणत्याही विशिष्ट किंवा आपतकालीन अशा परिस्थितीकरीता लावण्यात आलेली नाही. या सभेत घेण्यात आलेले अनुक्रमे ६४, ६५, ६६ हे विषय यापूर्वी दि. १५/०१/२०१५ रोजी आयोजित केलेल्या निलंबित करण्यात आलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेवरील निर्णयासाठी प्रलंबित आहे.

आजची सभा ही तहकुब करण्यात येत असून दि. १५/०१/२०१५ ची सर्वसाधारण सभेचे निलंबन शासनाकडून रद्द करुन एकत्र आजची तहकुब सभा दि. ०२/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करावी. याचे कारण आजच्या सभेचे विषय हे निलंबीत केलेल्या महासभेच्या विषयपत्रिकेवरील आहेत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, शासन का जो ओदश था वो आदेश क्या था। आदेश यह था की, उस सभा पहले बजेट की मिटींग लगाई जाए। और शासन के नियम अनुसार आपने बजेट की मिटींग लगाई और मिटींग में वो विषय हो गया उसके बाद कही भी यह नियम नहीं है। कायदा नहीं, कानून नही की दुसरी सभा बुला नहीं सकते। कोई भी विषय के अंदर में कोई भी निलंबन नहीं था। ऐसा नहीं था की यह विषय नही ले सकते दुसरे विषय नही ले सकते। मैं. सन्मा. सदस्य को बताना चाहता हूँ की, विशेष सभा इस शहर के अंदर ऐसे इमरजन्सी विषय है जैसे आज पानी का विषय है, शहर मैं महिने में इतनी तकलीफ पानी हो रहीं है। रोज कटौती हप्तेभर में दो बार कटौती हो रहीं है। महानगरपालिका मैं पानी के लिए मोर्चा आया था ऐसा ही हॉस्पीटल का एक विषय है जिसका उच्च न्यायालय के अंदर बार-बार आदेश प्राप्त हो रहे है। वो हॉस्पीटल भी शहर वे नागरिकों को चालू करना अत्यावश्यक है। वैसे ही परिवहन का विषय है। परिवहन की बसे तैयार होके पडी है। लेकिन उनके पार्किंग की व्यवस्था न होने के कारण से वो भी पेंडींग है। वो बस भी नागरिको के सुविधा के लिए लाना अत्यावश्यक है। महासभा में कोई भी हरकत नहीं होनी चाहिए। मैं इनसे निवेदन करना चाहता हूँ। शहर के गंभीर विषय है, अतिआवश्यक विषय है आम नागरिको से संबंधित है। इसके लिए इस विषय को लिया जाए।

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून भगवती शर्मा नी जे निवेदन केले ते स्पष्ट आहे. शासनाच्या नगरसचिवांनी निर्णय पाठविला होता. त्याप्रमाणे अर्थसंकल्पावर बैठक बोलवण्यात आली असता अर्थसंकल्प होऊन गेला. ज्या विषयामुळे तो आदेश सचिवांनी आपल्याकडे पाठविला होता महासभा निलंबित करावी कारण तो संपलेला आहे. म्हणून आता ही सभा चालवायला काही हरकत नाही. विषय महत्वाचे आहेत. सन्मा. या सभागृहाचे विरोधी पक्षनेता तथा या शहराचे आमदार श्री. नरेंद्र मेहता त्यांच्या पक्षाचे ते श्रेष्ठ आहेत. त्यांनी हा विषय जो आहे तो गांभिर्यपूर्वक विचार करावा. चार महत्वाच्या विषयामध्ये परिवहन आणि पाण्याचा विषय अतिमहत्वाचे आहेत. आपल्याकडे बसेस उपलब्ध होणार आहेत त्यासाठी वाहनतळ तयार करणे गरजेच आहे. तसेच पाणी आर्थिक प्रशासकीय मंजूरी दिली नाही तर कामाला गती मिळणार नाही. परत शासनाकडून निर्णय येईपर्यंत हा विषय प्रलंबित राहील. कुठेतरी ह्याच्यामुळे शहराचे नुकसान होणार आहे. ते स्थानिक आमदार आहेत. त्यांनी ह्या विषयावर गांभिर्यपूर्वक विचार करुन अग्रक्रम भूमिका घेतली पाहिजे. अशा परिस्थितीत त्यांनी परत-परत सभा तहकूब करणे योग्य नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, खर म्हणजे जुबेर इनामदारांना शहराची एवढी चिंता होती आज जे विषय आले आहेत हे विषय बजेट मंजूर झाला नसता तर हे विषय आले नसते. कारण बजेटमध्ये आम्ही प्रोव्हिजन करुन घेतली म्हणून हे विषय आज पटलावर येत आहे. त्यावेळी आम्ही शासनाकडे तक्रार करुन निलंबन केले नसते तर आजपर्यंत बजेट आला नसता एवढीच घाई होती तर सहा महिन्या अगोदर बजेट मंजूर करुन विषय आणायला पाहिजे होता आणि आजही मा. महापौर मॅडम ह्या विषयासाठी शासनाला आम्ही कालच जाऊन भेटलो. ज.ना. पाटील हे जे विशेष जुबेर इनामदारनी सांगितल की आपली मागची सभा निलंबित केली आणि महासभा, विशेष महासभा बजेटसाठी लावण्यासाठी आदेश निर्देश केले होते. हे निर्देश आपल्याला माहित आहे की हे आदेश मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून होत असतात. कुठल्या अधिकाऱ्यांच्या नाही. हे मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिलेले आहेत. आणि त्या अनुषंगाने त्या निर्देशावर जी काही कारवाई केली ती आपण शासनाला कळविली. जितपर्यंत त्याच्यावर मुख्यमंत्र्यांची परत सही होत नाही तितपर्यंत ती सभा बोलवता येत नाही. ज.ना. पाटील, आपल्या सचिवांचे म्हणणे आहे ३० दिवस तर आमचे निलंबनाचे रुटिन दिवस आहेत. ते ३० दिवस झाल्यावर त्याच्यावर निर्णय करणार, काय करायचे आहे, निलंबन रद्द करायचे आहे का विखंडित करायचा आहे की आपल्याला आदेश द्यायचा आहे. आपल्याला निर्णय द्यायचा बाकी आहे. आणि सगळ त्यांनी लॉ ऑफिसरला फाईल पाठवून ते मुख्यमंत्र्याकडे ते सादर होणार आहे. आपण सभा घेतली गृहित धरा की आपण की आम्ही एखादा निर्णय घेतला की या सभेमध्ये बस टर्मिनल बांधावा आणि ज्या दिवशी ती सभा परत लागेल त्या दिवशी एखाद्या सदस्याने ठराव मांडला की नाही लावायचा तर नक्की कुठला गृहित धरायचा हा कि तो कारण सभागृहात एकदा विषय पटलावर विषय आला की सभागृह त्याच्यावर निर्णय घेत असतो. प्रशासन त्याला बोलू शकत नाही की आम्ही विषय मागे घेतो. कारण एखादा पटलावर आल्यानंतर मला वाटल हे नाही ते करायच आहे तर त्यावेळी तुम्ही काय करणार? एका विषयावर दोन सभा कशा होऊ शकतात. आजच्या तारखेला एकच विषय दोन्ही सभेत प्रलंबित आहेत. ह्याच्यामध्ये पण आणि त्यामध्ये पण. निर्णय नक्की कशावर घ्यायचा ह्याच्यावर घ्यायचा की त्यावर घ्यायचा. ह्याचा प्रशासनानी खुलासा करावा. हा समजा आम्ही निर्णय घेतला की वाहनतळ बांधावे उद्या समजा बहुमत तिसऱ्याचे असेल ते बोलले नाही बांधायच मग काय करणार?

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, जैसे उन्होंने बोला आपकी जो शंका है, उसका निरसन प्रशासन के माध्यम से होना चाहिए। लेकिन मैं मेरी जानकारी जहाँ तक है, मैं बताता हुं विषय उस महासभा में प्रलंबित है। आज इस महासभा में इस विशेष सभा में सेम विषय के उपर में कोई निर्णय होता है वो विषय उस महासभा के माध्यम से जरुर आ जायगा लेकिन उसके अंदर में सचिव विषय पत्रिका में स्पष्ट लिया गया है दुसरे महासभा के अंदर में इस ठराव के क्र. के अनुसार वो निर्णय होता है। ऐसा लिखा जाएगा वो नहीं की उस महासभा में वो वापिस लिया जाएगा यह कानून है। आप प्रशासन को पूछीए आप बार-बार यह बोल रहे हो की कोई सभा वो निलंबन रद्द नहीं होता तब तक दुसरी सभा बूलाई नहीं जा सकती। सन्मा. विरोधी पक्षनेता आमदार साहब आपको बताता हूँ विशेष महासभा बुलाई जा सकती है और आज की महासभा नियमानुसार कायदा अनुसार बुलाई गई है और शहर के महत्तवपूर्ण विषय पर बुलाई गई है। तो कही भी कानून का उल्लंघन नहीं हो रहा है।

**नरेंद्र मेहता :-**

मैं आपके बात से सहमत हूँ। सभा बोलवायला माझा विरोध नाही तो आपला अधिकार आहे. तुम्ही एक नाही दोन सभा बोलवा आमचा आक्षेप आहे की हे विषय मागच्या सभेमध्ये प्रलंबित आहेत. दोन ठिकाणी दोन पटलावर विषय आहेत. नक्की कोणता निर्णय मानणार हा की हा. समजा मी ठराव मांडला आमचे बहुमत नसले तुमचे वेगळे एखादे मत असेल तर तुम्ही ठराव मांडला तर प्रशासनाने कशावर अंमलबजावणी करायची हे प्रश्नचिन्ह आहेत ना.

**भगवती शर्मा :-**

वही मैं आपको समझा रहा हूँ आपका खुलासा चाहिए तो प्रशासन के माध्यम से खुलासा लेलो।

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही तेच सांगितले.

**भगवती शर्मा :-**

इसके उपर खुलासा किजीए आपके शंका का समाधान करने के बाद करिए।

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम अभी जो भी विषय चला भगवती जी ने और जुबेर इनामदारने जो बोला बहुत महत्त्वपूर्ण विषय है। यह ट्रक टर्मिनल है या आरोग्य के लिए चंदा लेने की बात है अपने पास दो साल से विषय प्रलंबीत है यह विषय महत्वपूर्ण है तो पहले क्यों नही आए।

**नगरसचिव :-**

तरतूद वाचून दाखवतो. महानगरपालिकेने पारित केलेले कोणतेही ठराव तो पारीत झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत फेरबदल करता येणार नाही. किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश पालिका सदस्यांपैकी कोणत्याही विविक्षीत बाबतीत अधिनियमात

आवश्यक असेल अशा अधिक संख्येच्या सदस्यांनी पाठिंबा दिलेला आणि सभेत सहमत झालेला ठरावात फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल खंड "अ" मधील आवश्यक गोष्टी पूर्ण करुन अशा सभेची नोटिस देण्यात आली असली पाहिजे. अशा नोटिसी ज्या ठरावात असतात. सभेत फेरबदल करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा योजिले असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचा असलेली सुचना किंवा प्रथम नमूद केला पाहिजे. ठरावात कधी बदल करता येईल त्याचे स्पष्टीकरण वाचले.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावात कुठे बदल झाला.

**भगवती शर्मा :-**

इनका प्रश्न यह था की जो निलंबन सभा है उसमें इस विषय का समावेश है और आज उनमें से कुछ विषय हो रहे है। आज उन विषय पर ठराव द्वारा निर्णय होता तो जो निलंबन महासभा है वो रद्द होने के बाद निलंबन वापिस लेने के बाद महासभा लगती है तो उस विषय के उपर के अंदर में वापिस अजेंडा में वो विषय आएगा तब आप क्या निर्णय लेंगे मेरा यह कहना था मेरी समझ थी जो मेरी जानकारी थी। अगर आज वो निर्णय हो जाता है तो उस समय विषयपत्रिका भेजोगे उसके अंदर में आप उल्लेख करके भेजोगे की .....

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, भगवतीजी जे सांगतात ते बरोबर आहे. आपण आमचा विषय समजून घ्यावा. ज्यावेळी निलंबन रद्द होईल त्यावेळेला तशी सभा आपल्याला लावायला लागेल. निलंबन रद्द केले तर सभा रद्द केली तर विषय वेगळा आहे. निलंबन रद्द केले तर आपल्याकडे ऑलरेडी अजेंडा निघालेला आहे. शासन जो निर्णय देईल दोन दिवसात लावा, आठ दिवसात लावा किंवा आपल्यावर सोडतील मग ती विषयपत्रिका आपण चेंज करु शकाल त्याच्यात अमेन्ट किंवा डिलीट करु शकत नाही. तो आप कैसे लिखोगे की पिछली सभा में यह निर्णय हुआ है। आणि त्या दिवशी आपण सभेत नसलो आणि कोणी वेगळा ठराव मांडला.

**भगवती शर्मा :-**

महासभा में ऐसा बताना पडेगा। उसके अंदर फेरबदल नही हो सकता उसमें ठराव हो गया उसके बाद तीन महिने दुसरा ठराव हो नहीं सकता।

**नरेंद्र मेहता :-**

जो पहली सभा लगी है उसका महत्व है। दुसरी सभा का महत्व नहीं है। पहली सभा वो लगी है।

**भगवती शर्मा :-**

आज निलंबन है दुसरे पे महासभा के माध्यम से निर्णय ले सकते है। आपका कहना है उस विषय पत्रिका के अंदर निलंबन में यह विषय है लेकिन पहला विषय तो है ही नहीं। आपका उद्देश क्या है बताईए ना।

**नरेंद्र मेहता :-**

चार विषय आहेत. चार मधले तीन विषय तेच आहेत. एक ३७ चा विषय आहे. ते आजच्या आज होणार नाही त्याला एक दोन वर्ष लागेल. एवढी काय आवश्यकता नाही म्हणून आम्ही तहकूबचा ठराव मांडलेला आहे.

**भगवती शर्मा :-**

आप वो बोलिए एक साईड में बोलते हो निलंबन रद्द नहीं होता। सभा बूलाई नहीं जा सकती है।

**जुबेर इनामदार :-**

तहकूब सभा ह्या कारणामुळे होणार की बहुमताच्या आधारावर होणार आहे. शासनानी आम्हाला उत्तर दिलेले मा. महापौरांनी पत्र पाठवले आणि रितसर भाजपाला त्यांच्या सहकारी बंधूना शहरात विकास नको आहे का? स्थानिक आमदाराला शहराच्या विकासाची कामे करायची नाहीत.

**प्रशांत दळवी :-**

जुबेरजी आता बहुमत आठवले का?

(सभागृहात गोंधळ)

**राजेंद्र जैन :-**

बहुमत पाने के लिए जनता का प्यार पाना पडता है।

**जुबेर इनामदार :-**

भुमिका काय स्पष्ट आहे की बहुमताच्या आधारावर सभा तहकुब करायची. तांत्रिक बाबी काहीच नसणार अर्थसंकल्पावर चर्चा झालेली आहे. विषय आला आहे. बाकीचे विषय जे आज करायचे आहेत सन्मा. आमदार साहेब ह्या शहरानी तुम्हांला मत देऊन आज तुम्हाला आमदार केलेले आहे. तुमचे जास्त कर्तव्य आहे की हे विषय झालेच पाहिजेत. आम्ही शहराच्या विकासाच्या आड आलोच नाही. सत्ताधाऱ्यांनी तशी भुमिका कधी मांडलीच  नाही. सभा तहकूब करण्यासाठी काही तरी योग्य कारण असावे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, इस ठराव को हमारा स्पष्ट विरोध है। शहर के गंभीर विषय पे आपने मिटींग बुलाई है। आज चाहे बस हो, पानी हो सभी सुविधा के लिए इस शहर के नागरीकों की अत्यावश्यक गरज है। आपने विषय लाया हम आपकी तारीफ करते है और इनके ठराव का विरोध करते है।

**जुबेर इनामदार :-**

बहुमताच्या जोरावर सभा तहकूब करायला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भारतीय काँग्रेस पक्ष वतीने आम्ही ह्याचा निषेध व्यक्त करतो. शहराचे महत्वाचे विषय सभागृह चालते ते पत्रकार बघतात उद्या त्यांना एक चांगली बातमी येईल. शहराच्या विकासाच्या कामामध्ये अडथळा आणणारे ह्या शहराचे आमदार नरेंद्र मेहता .......

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम व्यक्तिगत बोलणे बरोबर नाही. एक वर्ष तुम्ही बजेट आणले नाही त्यावेळी काय झालेले. आता बजेटमध्ये जे विषय आपण बोलता......................

**मा. महापौर :-**

सुचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. अश्विन कासोदरिया ह्यांनी जो तहकूबीचा ठराव मांडला आहे तो मी मान्य करत आहे. परंतु काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस ह्यांचा विरोधही ह्याच्यात घेत आहे. आजची सभा दि. २/०३/२०१५ सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

**सभा तहकुबी ठराव क्र. ४९ :-**

महाराष्ट्र शासनाने दि. ०७/०१/२०१५ रोजी मा. आयुक्त यांना अर्थसंकल्पा विषयी तातडीने सभा लावावी असे निर्देश दिलेले होते. या सदंर्भात मा. आयुक्त सो।. यांनी मा. महापौर यांना लेखी पत्र देवून अर्थसंकल्पाबाबत सभा लावावी असे कळविले होते. त्यानंतर मा. महापौर सो।. यांनी अर्थसंकल्पा विषयी विशेष सभा न बोलवता सर्वसाधारण सभा दि. १५/०१/२०१५ रोजी आयोजित केलेली होती. या संदर्भात शासनाने दि. १४/०१/२०१५ रोजी मा. आयुक्त व मा. महापौर यांना दि. १५/०१/२०१५ च्या सभेचे निलंबन करुन मा. महासभेचे त्याच महिन्यात अर्थसंकल्पाविषयी विशेष सभेचे आयोजन करण्यांचे निर्देश दिलेले होते.

त्याचप्रमाणे दि. २०/०१/२०१५ रोजी विशेष सभेचे आयोजन करुन अंदाजपत्रकाला अंतिम मान्यता देऊन मा. आयुक्त सो।. यांनी दि. २८/०१/२०१५ रोजी शासनाला कळविले आहे व निलंबीत सभा लावण्याकरीता शासनाची मान्यता मागितलेली आहे.

निलंबित सभा लावणेबाबत शासनाची मान्यता आजपर्यंत प्राप्त झालेली नाही. आज दि. ०७/०२/२०१५ रोजी लावण्यात आलेली सभा ही कोणत्याही विशिष्ट किंवा आपतकालीन अशा परिस्थितीकरीता लावण्यात आलेली नाही. या सभेत घेण्यात आलेले अनुक्रमे ६४, ६५, ६६ हे विषय यापूर्वी दि. १५/०१/२०१५ रोजी आयोजित केलेल्या निलंबित करण्यात आलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेवरील निर्णयासाठी प्रलंबित आहे.

आजची सभा ही तहकुब करण्यात येत असून दि. १५/०१/२०१५ ची सर्वसाधारण सभेचे निलंबन शासनाकडून रद्द करुन एकत्र आजची तहकुब सभा दि. ०२/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करावी. याचे कारण आजच्या सभेचे विषय हे निलंबीत केलेल्या महासभेच्या विषयपत्रिकेवरील आहेत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(सभा तहकुब वेळ दुपारी १२.१० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**